# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.


Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

२० जुन, २०२०

☎ : 07172-264300

: 07172-255800

✍: 7447744100 (PRO)


# स्थानिक गुन्हे शाखेची अवैध दारूतस्करांविरूध्द कार्यवाही

## ३ चारचाकी वाहनास २६ लक्ष ८१ हजाराचा मुद्द्येमाल हस्तगत

दिनांक २०/०६/२०२० रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास गोपनीय माहिती मिळाली की, तळोधी येथील सोनु कटारे हा अविनाश नवरखेडे रा. हिंगणघाट याचे स्कॉर्पिओ वाहनाने सिंदेवाही येथील विरवा गावाजवळील बंद गोदामाजवळ देशी दारूचा माल आणुन मुल येथील नरसिंग अण्णा यास विक्री करणार आहे. अशा माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने रात्रो दरम्यान विरवा गावाजवळील पेट्रोलपंपाजवळ सापळा रचला असता, तीन वाहन ज्यामध्ये एक स्कॉर्पिओ, आणि दोन रिट्ज् येतांना दिसले. सदर तिन्ही वाहने गोदामाजवळ थांबुन वाहनातील इसम हे स्कॉर्पिओ वाहनातुन दारू काढुन रिट्ज वाहनात टाकत असतांना स्थागुशा पथकाने छापा टाकला असता, एक इसम जागेवरच मिळुन आला. सदर इसमास ताब्यात घेवुन विचारपुस करून वाहनाची झडती घेतली असता, ९८ बॉक्स देशी दारू किं. ९,८०,०००/—रू, लाल रंगाची रिट्ज गाडी क्र. एमएच ३३ ए १५७० किं. ५,००,०००/—रू, पांढऱ्या रंगाची रिट्ज गाडी क्र. एमएच३१ सिए ३४६८ किं. ५,००,०००/—रू आणि एक स्कॉर्पिओ वाहन क्र. एमएच३१ ईके ०१९५ किं. ७,००,०००/—रू, आणि एक सॅमसंग कपंनीचा मोबाईल फोन किं. १,०००/—रू असा **एकुण २६,८१,०००/—रू** चा मुद्द्येमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन सिंदेवाही येथे नोंद करण्यात आला असुन पुढिल तपास आणि आरोपीचा शोध सिंदेवाही पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. डॉ. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात पोनि. स्थानिक गुन्हे शाखा. श्री. ओ.जी. कोकाटे यांचे नेतृत्वात, पोहवा. धनराज खरकाटे, पोशि. अमोल धंदरे, गोपाल आतकुलवार, यांनी पार पाडली.

---

## रामनगर पोलीसांची अवैध रेतीतस्करांविरूध्द कार्यवाही

### २५ लक्ष ७७ हजारच्या मुद्देमालासह २ आरोपी अटक

दिनांक २०/०६/२०२० रोजी रामनगर पोलीसांना गोपनीय माहिती मिळाली की, मौजा अजयपुर जवळ अंधरी नदी शेजारील शेतात एक इसम जेसीबी मशीनच्या साहायाने रेती उचलुन हायवा ट्रकद्वारे चोरून नेत आहे. अशा माहितीवरून रामनगर पोलीसांनी तलाठी कर्मचारी यांचेसह अंधारी नदीजवळ जावुन पाहणी केली असता, एक इसम जेसीबी मशीनच्या साहायाने हायवा ट्रक मध्ये रेती लोड करीत होता. यावरून जेसीबी चालक आरोपी नामे तुळशिराम भाउजी देवतळे आणि हायवा ट्रक चालक आरोपी नामे आदिल खान अहमद खान रा. बाबुपेठ यांना अटक करण्यात आली. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन रामनगर येथे अप.क्र. ५४३/२०२० कलम ३७९,१८८,३४ भांदवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरच्या गुन्हयात एक जेसीबी मशीन क्र. एमएच ३४ एपी ३४३३ किं. १५,००,०००/—रू, एक हायवा ट्रक क्र. एमएच३४ एम ३६६४ किं.१०,००,०००/—रू, ३१ ब्रॉस रेती किं. ७७,५००/—रू असा **एकुण २५,७७,५००/—रू** चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन पुढिल तपास रामनगर पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. डॉ. महेश्वर रेड्डी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रपुर श्री. शिलवंत नांदेडकर यांचे मार्गदर्शनात पोनि. रामनगर श्री. प्रकाश हाके यांचे नेतृत्वात रामनगर पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि कर्मचारी यांनी केली.

———————————————————————————————